निलंबन रद्द करुन शासन सेवेत पुन:स्थापित करणेबाबत.

डॉ.अंशुमन सिताराम कारले, पशुधन विकास अधिकारी (गट-अ)

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन आदेश क्र.पसंप्र-२०१७/प्र.क्र.८७/पदुम-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक - ४ ऑक्टोबर , २०१७

शासन आदेश :-

पशुसंवर्धन विभागातील डॉ.अंशुमन सिताराम कारले, पशुधन विकास अधिकारी (गट-अ) यांना लाचेचा सापळा प्रकरणी पोलीस ठाणे विसरवाडी, जिल्हा नंदुरबार येथे गु.र.नं. २८/२०१६ ला.प्र.अधिनियम सन १९८८ चे कलम ७,१३ (१) (ड) सह (१३)(२) अन्वये दि. १२.३.२०१६ रोजी अटक करण्यात आली असल्याने त्यांना अटकेच्या दिनांकापासून दि. १८.४.२०१६ च्या आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले होते. डॉ. कारले यांच्याविरुध्द दि. २१.७.२०१६ च्या आदेशान्वये मा.न्यायालयात अभियोग दाखल करण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसेच दि.३.७.२०१७ च्या आदेशान्वये डॉ. कारले यांच्याविरुध्द विभागीय चौकशी आदेशित करण्यात आली आहे. डॉ. कारले यांच्या निलंबनास एक वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, दि.१४.१०.२०११ मधील नमूद अटी व शर्तींची पूर्तता होत असल्याने निलंबन आढावा समितीने डॉ. कारले यांचे निलंबन रद्द करुन त्यांना पुन:स्थापित करण्याबाबत शिफारस केली आहे. सबब, डॉ.कारले यांच्याविरुध्द प्रलंबित न्यायालयीन व विभागीय चौकशी प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधिन राहून डॉ. कारले यांचे निलंबन रद्द करुन त्यांना शासन सेवेत पुन:स्थापित करण्यात येत आहे. तसेच पुन:स्थापनेनंतर डॉ. कारले यांची पदस्थापना खालील तक्त्यातील त्यांच्या नावासमोर स्तंभ ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे पदावर करण्यात येत आहे.

क्र.	अधिकाऱ्यांचे नांव	निलंबनापूर्वीचे पदस्थापनेचे ठिकाण	पुन:स्थापनेनंतर पदस्थापनेचे ठिकाण
१	२	३	४
१	डॉ.अंशुमन सिताराम कारले, पशुधन विकास अधिकारी (गट-अ)	पशुधन विकास अधिकारी , पवैद श्रेणी-१ विसरवाडी ता.नवापूर, जि.नंदूरबार	पशुधन विकास अधिकारी, पवैद, श्रे-१ विक्रमगड, जि.पालघर

२. संबंधित अधिकारी यांनी त्यांच्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे. रुजू झाल्यानंतर रुजू अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा २०१७१००४१७५९३४१३०१ संकेतांक असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vinod Sopanrao Mendhe

Digitally signed by Vinod Sopanrao Mendhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3dfd984bb7c5aede090473e34b1c93fa9f36d97d56c0cf07812a43c5ca5d6a24, cn=Vinod Sopanrao Mendhe
Date: 2017.10.04 17:51:41 +05'30'

(वि.सो.मेंढे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत ,

१. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य,औंध,पुणे.
२. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त,नाशिक/ मुंबई
३. सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय), पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे
४. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, नाशिक/ ठाणे/ नंदुरबार
५. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, नंदुरबार/ पालघर
६. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक/ ठाणे/ नंदुरबार
७. संबंधित अधिकारी, (द्वारा - आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य,पुणे)
८. निवड नस्ती.